## मार्गदर्शक पुस्तिका क्र. 8

(मॅन्युअल - VIII )

### कार्यालयाचा भाग म्हणून अथवा सल्लामसलतहेतूर्थ नेमलेली दोन किंवा अधिक व्यक्तींचा समावेश असलेली मंडळे, परिषदा, समित्या आणि इतर संस्था यांची यादी आणि अशा मंडळ, परिषदा, समित्या व इतर यांच्या बैठका जनतेस खुल्या आहेत किंवा अशा बैठकांचे इतिवृत्त जनतेस सुसाध्य असल्यास त्याची यादी

कार्यालयाचा भाग म्हणून अथवा सल्लामसलतहेतूर्थ नेमलेली दोन किंवा अधिक व्यक्तींचा समावेश असलेली मंडळे, परिषदा, समित्या आणि इतर संस्था यांची यादी आणि अशा मंडळ, परिषदा, समित्या व इतर यांच्या बैठका जनतेस खुल्या आहेत किंवा अशा बैठकांचे इतिवृत्त जनतेस सुसाध्य असल्यास त्याची यादी -

**1)** प्रभाग समिती `एस`व `टी` **2)** त्रिसदस्य समिती

प्रभाग समिती

भारतीय राज्य घटनेच्या 74 व्या दुरुस्तीनुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 मध्ये सुधारणा करुन, कलम 50 टी टी अन्वये, माहे जानेवारी 2000 मध्ये 16 प्रभाग समित्यांची स्थापना करण्यात आली. स्थापन करण्यात आलेल्या प्रत्येक प्रभाग समितीचा कालावधी हा महानगरपालिकेच्या कालावधीबरोबरच संपुष्टात येतो.

प्रभाग समितीत यांचा समावेश असतो -

1) प्रभाग समितीच्या प्रादेशीक क्षेत्रात येणा-या निवडणूक प्रभागाचे प्रतिनिधीत्व करणारे नगरसेवक.
2) प्रभाग समितीचे विभागीय सहाय्यक आयुक्त.
3) तीन पेक्षा जास्त नाही, अशा संख्येचे इतर सदस्य जे प्रभाग समितीच्या क्षेत्रातील समाज कल्याण कार्य करणा-या मान्यताप्राप्त अशासकिय संस्था अथवा समाज आधारीत संस्थांमधून उपरोक्त 1 मध्ये नमूद केलेल्या नगरसेवकांनी नामनिर्देशीत केलेले असतील. सदर सदस्य हे त्या प्रभाग समितीच्या कार्यकक्षेतील मतदार असणे आवश्यक आहे. तसेच राज्य सरकारने विहित केलेल्या निकषानुसार अशासकिय संस्थेची मान्यता असणे, सदस्य म्हणून निर्देशनासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता असणे व राज्य सरकारने विहित केलेल्या पध्दतीने नामनिर्देशीत होणे आवश्यक आहे.

प्रभाग समितीची बैठक महिन्यातून एकदा प्रभाग समिती अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली होते.

प्रभाग समितीत पुढील प्रमाणे कामकाज चालते:

(1) नागरीकांच्या स्थानिक व महत्वाच्या नागरी सुविधा उदा. पाणी पुरवठा, गटारे स्वच्छता इ. बाबतच्या तक्रारींचे जलद निरीकरण.

(2) विभागात अर्थसंकल्पाच्या विविध शिर्षकांतर्गत येणा-या खर्चाच्या अंदाजपत्रकांचे प्रस्तावांवर आयुक्तांना सादर करण्यापूर्वी शिफारस करणे.

(3) महापालिकेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पातील तरतूद उपलब्ध असेल तर प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात करावयाच्या रु. 5 लाख पर्यंतच्या खर्चाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय व वित्तिय मंजूरी देणे.

----